04 MAR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


लोकमत

# शिवाजी विद्यापीठात जपानी कला-संस्कृतीचे दर्शन

## विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडूनही जपानी, रशियन भाषेत गीत-संगीताचे सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पारंपरिक खेळ, जपानी ओरिगामी कला, चित्रकला, संगीत अशा वातावरणात बुधवारी शिवाजी विद्यापीठात जपानी कला-संस्कृतीचा आविष्कार पाहायला मिळाला. निमित्त होते जपानच्या क्योतो सेइका विद्यापीठातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये जपानी विद्यार्थ्यांनी पारंपरिक खेळ सादर केले. (छाया : नसीर अत्तार)

विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या वतीने वि. स. खांडेकर सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही जपानी व रशियन भाषेत गीत-संगीताचे सादरीकरण केले. जपानी विद्यार्थ्यांनी स्वत: साकारलेली चित्रे, संगीत, शिल्पकला, व्हिडिओ, पारंपरिक वस्त्र डिझाईन, मांगा कॉमिक्स आदी विविध कलाविष्कारांतून तेथील संस्कृतीचे दर्शन घडविले. ओरिगामी, जपानी पारंपरिक खेळ केन्दामा यांची प्रात्यक्षिके दाखविली व करून घेतली. तत्पूर्वी समन्वयक सायुरी मात्सुनो व क्योतो सेइका विद्यापीठातील प्रा. शिन मात्सुमुरा यांनी डॉ. मेघा पानसरे व इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेतली.

शिवाजी विद्यापीठ आणि क्योतो सेइका विद्यापीठ यांच्यात कोणत्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्य व ज्ञान-कौशल्यांची देवाण-घेवाण होऊ शकते, याविषयी चर्चा झाली.

### विद्यार्थ्यांना जपानमध्ये भवितव्य : मोत्सुनो

- जपानी भाषेच्या विद्यार्थ्यांना जपानी संस्था व कंपन्यांत शिक्षण आणि नोकरीच्या अनेक संधी आहेत. तेव्हा भाषा, मानव्यशास्त्र, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, ॲनिमेशन व संगीत अशा विविध विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना जपानमध्ये भवितव्य आहे, असे मत मात्सुनो व मात्सुमुरा यांनी व्यक्त केले.
- क्योतो सेइका विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ या संस्थांमधील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रम, विद्यार्थी-शिक्षक भेट व ऑनलाईन व्याख्याने या उपक्रमांसाठी परस्पर सामंजस्य करार करता येऊ शकेल, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

0 4 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात घडले जपानी कला-संस्कृतीचे दर्शन

**कोल्हापूर, ता. ३ :** जपानी ओरिगामी कला, पारंपरिक खेळ, वस्त्रपरंपरा, चित्रकला, संगीत आदींच्या साथीने शिवाजी विद्यापीठातला दिवस जपानमय होऊन गेला. त्यामुळे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक भारावून गेले.

जपानच्या क्योतो सेइका विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठास भेट दिली. विदेशी भाषा विभागातर्फे या विद्यार्थ्यांच्या साथीने विशेष कला-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आपल्या जपानी, रशियन भाषाकौशल्यासह त्या भाषांतील गीत-संगीताच्या ज्ञानाचे सादरीकरण केले. जपानी विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांनी स्वतः निर्मिलेली चित्रे, संगीत, शिल्पकला, व्हिडिओ, जपानी पारंपरिक वस्त्र डिझाईन, मांगा कॉमिक्स आदी विविध कलाविष्कारांचा स्थानिक विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. ओरिगामी, जपानी पारंपरिक खेळ केन्दामा यांची प्रात्यक्षिके दाखविली आणि उपस्थितांकडून करून घेतली.

**सांस्कृतिक कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अधिविभाग, इंटरनॅशनल अफेअर्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने जपानी शिक्षक, विद्यार्थी भेटीचा कार्यक्रम झाला. त्याअंतर्गत समन्वयक सायुरी मात्सुनो आणि क्योतो सेइका विद्यापीठातील प्रा. शिन मात्सुमुरा, कोता तोदा, युको यासुइ, विविध विद्याशाखांचे विद्यार्थी रिन्तारो फुजिता, तेम्मा मियोशी, कोता योशिओका, रियोता सकामोतो, केन योशिकावा, त्सुमुगी निशिमुरा, मोएको नाइतो, युकिका नारादाते, कुणाल मात्सुनो यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश होता. समन्वयक मात्सुनो, प्रा. मात्सुमुरा यांनी डॉ. मेघा पानसरे व इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. त्यानंतर वि. स. खांडेकर भाषा भवन येथील सभागृहात कला-सांस्कृतिक कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आणि जपानच्या विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे बुधवारी पारंपरिक जपानी ओरिगामी कलेचे सादरीकरण केले.

## 'सामंजस्य करार करता येईल'

▪ 'भाषा, मानव्यशास्त्र, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, ॲनिमेशन, संगीत अशा विविध विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना जपानमध्ये भवितव्य आहे', असे मत मात्सुनो व मात्सुमुरा यांनी व्यक्त केले. त्यावर क्योतो सेइका विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रम, विद्यार्थी-शिक्षक भेट, ऑनलाईन व्याख्याने अशा उपक्रमांसाठी परस्पर सामंजस्य करार करता येऊ शकेल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

लोकमत

# महान शिवाजी ग्रंथाचे सोमवारी प्रकाशन

कोल्हापूर : थोर इतिहासकार डॉ. बाळ कृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' या शिवचरित्रावरील ग्रंथाचा मराठीत अनुवाद करून ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार यांनी महान शिवाजी खंड एक - दोन व खंड तीन-तीन एकत्रित हे ग्रंथ संपादित केले आहेत. या दोन ग्रंथांचा प्रकाशन सोहळा सोमवारी (दि. ६) विद्यापीठाच्या शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार, खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते व शाहू छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

सकाळ

# 'महान शिवाजी' ग्रंथाचे सोमवारी प्रकाशन

कोल्हापूर : इतिहासकार डॉ. बाळ कृष्ण यांच्या 'शिवाजी द ग्रेट' या शिवचरित्राच्या 'महान शिवाजी : खंड १ ते ४' या मराठीत अनुवादित ग्रंथाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात सोमवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता होणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत कुमार केतकर यांच्या हस्ते, तर श्री शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. जयसिंगराव पवार यांनी 'राजर्षी शाहू साहित्यमाला'अंतर्गत या ग्रंथाचे संपादन केले आहे.

04 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची 'सुवर्ण' कामगिरी

## बंगळूर येथील जैन विद्यापीठात राष्ट्रीय युवा महोत्सव

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : बंगळूर येथील जैन विद्यापीठात २४ ते २८ फेब्रुवारीदरम्यान ३६ वा राष्ट्रीय युवा महोत्सव उत्साहात पार पडला. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने रॅली, लोकनृत्य, पाश्चिमात्य समूहगीत आणि लोकवाद्यवृंद प्रकारात सहभागी होत तीन सुवर्ण, तर एका रौप्यपदकाची कमाई केली.

या महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने रॅली, लोकनृत्य, पाश्चिमात्य समूहगीत प्रकारात प्रथम क्रमांक आणि लोकवाद्यवृंद प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला. या संघाने लोकनृत्य प्रकारात सादर केलेल्या 'ढोलू कुनिथा' नृत्यास महोत्सवाच्या ३६ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच सुवर्णपदक मिळाले. विद्यापीठ संघातील २५ विद्यार्थ्यांना सुवर्ण आणि नऊ जणांना रौप्यपदक मिळाले.

या संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



बंगळूर : येथील जैन विद्यापीठात झालेल्या ३६व्या राष्ट्रीय युवा महोत्सवातील रॅलीत प्रथम क्रमांक प्राप्त करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

दरम्यान, या संघासोबत युवा महोत्सव समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी (नथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), डॉ. प्रकाश गायकवाड (संचालक, विद्यार्थी विकास विभाग उपस्थित होते. संघ व्यवस्थापक म्हणून शीला मोहिते (मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव), सुरेश मोरे (वरिष्ठ सहाय्यक, विद्यार्थी विकास विभाग) यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
04 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास तीन सुवर्ण, एक रौप्य

## जैन युनिव्हर्सिटीचा ३६ वा राष्ट्रीय युवा महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जैन युनिव्हर्सिटी, बेंगळुरू येथे ३६ वा राष्ट्रीय युवा महोत्सव पार पडला. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा ३५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये रॅली, लोकनृत्य व पाश्चिमात्य समूहगीत यामध्ये प्रथम, तर लोकवाद्यवृंद प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

स्पर्धेत सहभागी २५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, तसेच ९ विद्यार्थ्यांना रौप्यपदक प्राप्त झाले. युवा महोत्सवामध्ये १२४ विद्यापीठांनी सहभाग घेतलेला होता. सहभागी १२४ विद्यापीठांतून शिवाजी विद्यापीठास रॅलीसाठी प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक प्राप्त झाले, तसेच लोकनृत्य 'ढोलू कुनिथा' या नृत्यास राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या ३६ वर्षांच्या इतिहासामध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथमच सुवर्णपदक प्राप्त झाले.

विद्यापीठ संघास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. संघासोबत युवा महोत्सव समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. प्रकाश गायकवाड, संघ व्यवस्थापक म्हणून शीला मोहिते, सुरेश मोरे आदी होते.

जनसंपर्क कक्ष
04 MAR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : जैन युनिव्हर्सिटी बंगळूर येथे झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव २०२२-२३ मध्ये शिवाजी विद्यापीठाने रॅली, लोकनृत्य व पाश्चिमात्य समूहगीत स्पर्धेत प्रथम व अन्य स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी. (छाया : अर्जून टाकळकर)

# बंगळूरमधील राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेत प्रथम

**कोल्हापूर :** जैन युनिव्हर्सिटी बंगळूर येथे झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव २०२२-२३ मध्ये शिवाजी विद्यापीठाने रॅली, लोकनृत्य व पाश्चिमात्य समूहगीत स्पर्धेत प्रथम तर लोकवाद्यवृंदमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. यामध्ये विद्यापीठाच्या ३५ सदस्यांचा समावेश होता.

या स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, ९ विद्यार्थ्यांना रौप्यपदक मिळाले. युवा महोत्सवामध्ये १२४ विद्यापीठांनी सहभाग घेतलेला होता. शिवाजी विद्यापीठास रॅलीसाठी प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक प्राप्त झाले. तसेच लोकनृत्य 'ढोलू कुनिथा' या नृत्यास प्रथमचं सुवर्णपदक प्राप्त झाले.

राष्ट्रीय युवा महोत्सव विद्यापीठ संघास कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. संघासोबत युवा महोत्सव समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी (मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली) व डॉ. प्रकाश गायकवाड संचालक, विद्यार्थी विकास विभाग उपस्थित होते. विद्यापीठ संघ व्यवस्थापक म्हणून श्रीमती शिला मोहिते, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव व सुरेश मोरे, वरिष्ठ सहायक, विद्यार्थी विकास विभाग यांनी काम पाहिले. रॅली - प्रथम क्रमांक, लो-प्रथम क्रमांक (सहभागी विद्यार्थी -१०), पाश्चिमात्य समूहगीत - प्रथम क्रमांक (सहभागी विद्यार्थी - १०) लोकवाद्यवृंद - तृतीय क्रमांक (सहभागी विद्यार्थी - ९)लोकवाद्यवृंद - तृतीय क्रमांक (सहभागी विद्यार्थी -९)

पुढारी

# विद्यापीठात मिळणार स्टार्टअप्सना प्रोत्साहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नावीन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योग याबाबत केंद्रातून नवयुवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, एम.एस.एम.ई. व इतर शासकीय व खासगी संस्थांकडून सीड-मनी मिळण्याची संधी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांनी आपल्या संकल्पना दि. १५ मार्च २०२३ पर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर गुगल फॉर्ममध्ये भराव्यात व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य केंद्राचे संचालक प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# सुशांत गुरव विद्यापीठ गुणवत्ता यादीत द्वितीय



**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयाच्या सुशांत गुरव याने शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत एम. ए. समाजशास्त्रमध्ये ७७.८१ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सुशांतला संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांचे प्रोत्साहन, तर सचिव व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम, डॉ. एस. डी. सावंत, डॉ. आर. पी. हेंडगे आदींचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# दीक्षान्त समारंभाबाबत राज्यपालांना विद्यापीठाचे पत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने ५९ व्या दीक्षान्त समारंभाबाबत राज्यपाल रमेश बैस यांना पत्र पाठविले आहे. त्याद्वारे विद्यापीठ प्रशासनाने त्यांच्याकडे या समारंभ आयोजनासाठी तारीख निश्चित करून देण्याची विनंती केली आहे. या पत्रात मार्चचा दुसरा आणि तिसऱ्या आठवड्यातील तारीख निश्चितीबाबत सुचविले आहे. विद्यापीठाने १६ फेबुवारीला दीक्षान्त समारंभ घेण्याचे निश्चित केले होते. त्याचे प्रमुख पाहुणे देखील ठरले. मात्र, तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला. त्यासह विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने काही अपरिहार्य कारणास्तव दीक्षान्त समारंभ स्थगित करण्याचा निर्णय १३ फेब्रुवारीला जाहीर केला. नवे राज्यपाल रमेश बैस यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यामुळे या समारंभाचे आयोजन आणि त्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठ प्रशासनाने त्यांना पत्र पाठविले आहे. त्यांच्या उत्तराच्या प्रतीक्षेत विद्यापीठ प्रशासन आहे.

Times of India

# SUK calls for ideas to address concerns of millet production

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The incubation centre set up at the Shivaji University, Kolhapur (SUK) has sought ideas to address the concerns faced during each stage of millet production.

The year 2023 has been declared as "Internation Year of Millets" by the United Nations at the behest of the Government of India. Millets primarily comprise bajra, ragi and jowar and they are abundantly produced in Kolhapur, Sangli and Satara districts — the jurisdiction of the university.

The university has set up the incubation centre with a grant of Rs 5 crore sanctioned by the state government. Every month, a new challenge is floated for entrepreneurs, students, teachers, researchers and common public. This time, the university has sought start-up ideas to solve the concerns of millet production using smart technology.

## MARCH 13 DEADLINE FOR ENTRIES

M S Deshmukh, in-charge of the incubation centre, said, "Farmers face several challenges while growing millets at various stages — sowing, growing, harvesting, storage as well as marketing. There is ample scope to provide solutions to the farmers and other stakeholders through smart ideas. We, therefore, have sought the ideas and the last date for submission is March 13. The ideas submitted will be scrutinised by our experts for technical, operational and financial viability. Once the idea is screened and tested, the proposers of the idea will get seed-funds to develop a wholesome model."

Since the establishment of the incubation centre, the SUK has screened over 23 ideas ranging from agriculture, health, environment, commerce and food industry. Funds for this are raised from the corpus of the state innovation society of the state government, Start-up India programme, MSME department as well as from the private sector.